वंदेमातरम् ।

१९२

शाहिरी .... .... .... डफ

# पोवाडा ९ वा

जवानमर्द ब्राह्मणभाई यांचा

( बापु गोखला )

# पोवाडा

—लेखक—

प्रल्हादराय

जळगांव, पू. खा.

शके १८५६ ] आवृत्ति १ ली [ सन १९३४

मुल्य १॥ आणा.



१२३

श्री. डॉ. प. म. केतकर पुणें.

—यांस—

## सादर—समर्पण.

—शाहीर.

# प्रस्तावना

महाराष्ट्राचा खरा जिव्हाळा त्यांच्या वाङमयांतील लावण्यांपोवाड्यांतून जितका दृष्टीस पडतो तितका दुसऱ्या कोणत्याच वाङमय प्रकारांत आढळणार नाहीं. इंग्रजी अंमल सुरू होईपर्यंत या दोन्ही वाङमय प्रकारांस चांगली तेजी होती. लावणी सामान्यतः समाजस्थितिवर्णनपर असे व पोवाडा इतिहासपर असे. पेशवाई बुडाल्यावर महाराष्ट्राचा इतिहास संपल्यामुळें शाहीरी वाङमयापैकीं पोवाड्याची प्रथा बहुतेक संपुष्टांत आली किंबहुना नामशेष झाली. लावणी ही समाजस्थितिदर्शक असल्यामुळें तिचा मात्र लोप न होतां तिची परंपरा अद्याप पुष्कळ टिकून आहे. पेशवाईच्या अस्तानंतर पन्नास पाऊणशें वर्षांनंतर इंग्रजी ज्ञानानें नवी दृष्टि प्राप्त झालेली चिपळूणकरादिकांची जी विद्वान् व देशभक्त पिढी निर्माण झाली तिनेंच प्रथम इतिहासाचें एक साधन म्हणून पोवाड्यांचा पुनरुद्धार केला. त्यामुळें इतिहासाचें ज्ञान होण्यास मदत होऊन पोवाड्याबद्दल पुन्हां सुशिक्षितांत प्रेम उत्पन्न झालें.

पुढें त्याही काळानंतर सुशिक्षितांत जे चळवळे देशभक्त निर्माण झाले, त्यांपैकीं कांहींना मतप्रसाराचें एक उत्कृष्ट साधन म्हणून पोवाड्याचा फार उपयोग झाला.

छापलेले पोवाडे डोळ्यांवाटे शुद्ध ज्ञानाच्या रूपानें डोक्यांत उतरविण्यापेक्षां ते गाऊन कंठावाटे हृदयांत उतरविण्याचा प्रयत्न करून देशभक्त बॅ. सावरकरांसारख्यांनीं पोवाड्याचा प्रकार लोकप्रिय केला. आधुनिक काळांतील पोवाड्यांचे तेच पहिले प्रणेते होत. पण चळवळीचें साधन या दृष्टीनेंच त्या पोवाड्यांचा उपयोग होत असल्यामुळें नांवाखेरीज त्यांत जुन्या पोवाड्यांचें स्वरूप बहुतेक नव्हतेंच. सुशिक्षितांच्या भाषेंत लिहिलेलें वीररसपर ऐतिहासिक काव्य असेंच त्याचें वर्णन करावें लागेल. मेळ्यांतील मतप्रचारकी पदांची आणि त्यांची जात एकच. "**इतिहास पुराणी लिहिला**" या सन्मित्र समाज मेळ्याच्या सुरत कॉन्ग्रेसच्या पोवाड्यासारखाच तो एक प्रकार आहे.

पण त्या कालानंतर फिरून पोवाड्याच्या स्वरूपरचनेंत बदल होण्याचा योग आला. या कालावधींत अनेक लेखकांनीं पोवाड्याविषयीं लिहून अभ्यास करून जुना साज कायम ठेवूनच पोवाडा निर्माण करावा–सध्यांच्या काळाला धरून पण जरूर तितकाच भाषेंत वगैरे फेरफार करावा, पण चाली, हत्यारें, भाषा व ढंग हीं सर्व जुनीं राखण्यांतच पोवाड्याचें वैशिष्ट्य आहे, यांतच खरी खुमारी, हें पटवून दिलें. त्याच वेळीं पुण्यास शिवजयंती–उत्सवाच्या निमित्तानें दोनतीन वर्षें फार मोठ्या प्रमाणावर जुन्या गोंधळी शाहिरांना आमंत्रण करून फार मोठे फड होऊन जुन्या पद्धतीच्या पोवाड्यांची लज्जत काय आहे हें सप्रयोग दाखविण्यांत आलें आणि तेव्हांपासूनच ब्राह्मण वर्गांतले सुशिक्षित कवी, गवई व हौशी लोकही पुढें सरसावून आज दिसणारी शाहीर परंपरा फैलावली या परंपरेंतील नामांकित शाहीरांत प्रस्तुत प्रल्हादराय शाहिरांची म्हणजे जामखेडकरांची गणना आहे.

त्यांनीं आजवर अनेक ऐतिहासिक कथानकांवर व वर्तमान प्रसंगांवर पोवाडे रचले असून ते फार लोकप्रिय झाले आहेत. प्रस्तुत बापू गोखल्याचा पोवाडाही चांगला वठला आहे. आज ऐतिहासिक भागावर पोवाडा लिहिणाऱ्या सुशिक्षितानें तरी नुसत्या जुन्या पोवाड्यांवर किंवा बखरीवर विसंबून न राहतां इतिहाससंशोधकांनीं आजतागायत जी नवी माहिती उपलब्ध केली ती सर्व जमेस धरली पाहिजे व तिचा समावेश केला पाहिजे. भाषा, चाली इत्यादि मात्र जुन्याचा आभास उत्पन्न करणारीं पाहिजेत. प्रल्हादरायांचे प्रयत्न याच दृष्टीचे असून ते चांगले वठले आहेत.

बापु गोखल्याच्या पोवाड्याप्रमाणेंच त्यांनीं आतां यापुढें राक्षसभुवन, आप्पासाहेबांची वसईची मोहिम, इत्यादि विषय घेऊन नव्या माहितीनें नटवून ते लोकप्रिय करावेत.

"शाहीर तोच कीं" जो कवित्वही करतो आणि गोंधळ्यांप्रमाणें गाऊनही दाखवितो. प्रल्हादरायांजवळ हे दोन्ही गुण असल्यामुळें त्यांचे प्रयत्न सहजच यशस्वी होतील.

पुणें शहर
२–७–१९३४

**य. न. केळकर**

 ११६

# प्रारंभीं

प्रस्तुत पोवाडा लिहिण्यापूर्वीं पूर्वींचे जुने पोवाडे पुणें एथील इतिहास-संशोधक श्री. य. न. केळकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांतील खडकी व अष्टीची लढाई हा पोवाडा वाचनांत आला. त्यानंतर कांहीं दिवसांनीं शाहीर दळवी यांनीं केलेला पोवाडाही ऐकण्यांत आला. पण या दोन्हीही पोवाड्यांनीं मनाचें समाधान होईना. आणि लागलेली तळमळही नाहींशी होईना. अशा प्रसंगीं जळगांव सारख्या शहरांत इतिहासाचीं साधनेंही मिळेनात. तपासाअंतीं देशभक्त प्रो० शि. म. परांजपे यांनीं मराठ्यांच्या लढाया ही लेखमाला चित्रमयगजगत् मासिकांतून प्रसिद्ध केलेली आहे व त्याचेंच पुस्तक छापून तयार असून तें चित्रशाळेंत मिळातें. सदरचें पुस्तक मिळविल्यानंतर जुन्या व नव्या माहितीचा मेळ घालून सदरचा पोवाडा लिहिला आहे.

त्याचप्रमाणें माझ्या विनंतीस मान देऊन, श्री. आण्णासाहेब केळकर यांनीं प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

पुणें ता. ५-७-१९३४
शके १८५६

सर्वांचा कृपाभिलाषी
शाहीर

[ लेखकानें सर्व प्रकारचे हक्क आपले स्वाधीन ठेविले आहेत. ]

(४)

# पोवाड्यांतील कथानक

## चौक १ ला

या पोवाड्यांच्या काळीं पुण्यास शेवटचे रावबाजी हे पेशव्यांच्या गादीवर होते. त्या वेळीं ईस्ट इंडिया कंपनी हळुहळू आपले हातपाय पसरविण्याचे मार्ग निष्कंटक करीत होती. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं बहुतेक मराठे सरदार पेशव्यांस आपसांतील दुफळीमुळें सोडून गेले होते, कित्येक सोडण्याचे मार्गे होते. कित्येक वरकरणीं आम्ही पूर्ण स्वामिनिष्ठ आहोंत असें भासवीत होते. ही जर सरदार मानकऱ्यांची स्थिति तर सैनिक कोण कोणाचे ? व त्याचमुळें स्वराज्यरूपी सूर्यास राहूकेतूसारखे उपग्रह आणि शुक्राचार्यासारखे धर्मगुरु म्हणविणारे तेजस्वी राहु केतु शत्रूस फितुर होऊन स्वराज्यरूपी सूर्यास ग्रहण लावीत होते. त्या वेळीं जर कोणी या ग्रहणास जोरानें प्रतिकार केला असेल तर तो जवानमर्द ब्राह्मणभाई बापु गोखले यांनीं केला व तोच खरा एकच धीर किंवा एकखांबी स्वराज्याचा आधार असा बापु गोखलाच होय.

## चौक २ रा

ईस्ट इंडिया कंपनीनें केलेल्या कराराप्रमाणें पेशव्यांत आणि त्यांच्या प्रतिनिधींत कांहीं कांहीं बाबतींत मतभेद होऊन उभय पक्ष युद्धास तयार झाले. आणि त्यांच्या प्रथम चकमकी लहासहान उडाल्या. पण गणेश खिंडीची आणि येरवड्याची चकमक बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होऊन तिची लाट खडकाच्या बंगल्यावरील कंपनीच्या प्रतिनिधीपावेतों पोहोंचून तिचेंच, पर्यवसान खडकीच्या लढाईंत झालें. या वेळीं पुणें येथील पर्वतीच्या टेकडीवरून रावबाजी हे दुर्बिणींतून युद्धस्य वार्ता रम्याः पाहात होते. युद्ध ऐनरंगांत आलें असतां व सर्व बाजूंनीं कंपनीची शिबंदी सेनानी बापु गोखले यांनीं कैचींत धरली आहे अशा ऐन वेळीं कसल्या का कारणानें असेना, पण रावबाजींच्या मनांत कंपनीच्या स्नेहाचा उमाळा येऊन त्यांनीं सेनापतिकडेस टाकोटाक सांडणीस्वार पाठवून धुमश्चक्री बंद करण्याचा हुकूम दिला. आणि आमचे ते दोस्त आहेत, त्यांस दुखवूं नका पुढच्या पुढें पाहूं म्हणून त्यांस युद्धांतून माघार घ्यावी लागली. युद्ध समाप्तीनंतर रावबाजी समवेत बापु

गोखले यांनीं सिंहगडाचा रस्ता धरला. त्यांच्या मागें टरनरही मागोमाग शह देण्यासाठीं रवाना झाला. त्यास हूल दाखवून साताऱ्यास वळसा घालून माहुलीस दाखल झालें याच ठिकाणीं सरदार निपाणकर एक हजार एकांडे स्वारांसह येऊन मिळाले. पुढच्या मुक्कामास जातांना सालप्याच्या घाटांत सैनिक ठेवून सर्व मंडळींनीं मार्ग आक्रमिला.

## चौक ३ रा

मार्ग क्रमीत असतांना त्यांस वाटेंत सरदार विंचूरकर येऊन मिळाले. रावबाजी व बापु गोखले यांची सैन्यासह दौड इतक्या जोराची होती कीं स्मिथ त्यांना ठिकठिकाणीं अडविण्यास जात असतां त्यास जोराचा प्रतिकार बापुस करण्याऐवजीं त्यास त्या जागीं ती मंडळी सांपडणें तर मुष्कील होत असेच पण त्यांचा मार्गही कळणें कठीण जाई. ही धांवपळ सुरू असतां स्मिथ व त्याचें सैन्य यांस त्राही भगवान होई. अशा स्थितींत स्मिथचें सैन्य शिरूरास जाऊन वहातुकीस अवघड अशा तोफा वगैरे सामान टाकून सड्या स्वारीनिशीं संगमनेरास आले. इकडे बापु गोखले वगैरे सरदार रावबाजी-सह नाशिक येथें येऊन पोहोंचले होते. त्याच वेळीं त्यांस त्र्यंबकपंत डेंगळे येऊन मिळाले. ही मंडळी पुन्हां पुण्याच्या रोखानें पुणें घेण्याकरितां चाकण-वर येऊन थकडली. ही बातमी स्मिथ यास कळतांच तोही तिकडे धांवत सुटला-या वेळीं कंपनीच्या कवायती फौजेची शिस्त तर टिकली नाहींच पण ती शिस्त त्याच्या नांवानें ढळढळां रडली.

## चौक ४ था

अशा तऱ्हेनें धुमाकुळ उडवीत मराठे वीर चालले असतां पुन्हां ते पुण्यास वळसा घालून बाजूनेंच गेले पण इकडे फितुर झालेल्या लोकांच्या पोटांत भीतीच्या गोळ्यांनीं थैमान घातला व आतां जर पेशव्यांनीं पुन्हां पुणें सर केलें तर आपल्या जीवित्वाची आणि धनदौलतीची धडगत होणार नाहीं म्हणून भीतीनें गाळण उडाली आणि थरथरा कापावयास लागले. फितुरी. मुळें देशाचें कसें नुकसान होतें हें या चौकांत दाखविलें असून स्मिथसारख्या कट्टचा शत्रूसही म्हणावें लागलें कीं, "जोंपर्यंत बापु गोखले जिवंत आहे तोंपर्यंत आम्हास हें राज्य मिळणें तर शक्य नाहींच पण रानोमाळ मात्र फिरावें लागणार हें खास."

# चौक ५ वा

अशा तऱ्हेनें एकमेकांना झुकांड्या देत देत उभयतां सैन्यांची गांठ कोरेगांवानजीक भिमथडीवर पडली. सदर समयीं सेनापति स्मिथ गर्वानें बोलला कीं, आम्ही गोखले याच्या सैन्याची पाणवाट अडवून धरली आहे तर ती खुली करण्याकरितां रक्ताचे पाट वाहवावे लागतील. उभय पक्षांत तुमुल युद्ध होऊन गोखल्यानें रस्ता खुला केला आणि गांवांत शिरले. त्या प्रसंगीं बुईन, गेट, स्मिथ वगैरे मुख्य लोक धर्मशाळेच्या आश्रयानें राहिले. पण तीही धर्मशाळा त्यांनीं सर करून बुईन, गेटास फाटकावर बांधून त्यास कापून काढिलें. त्या ठिकाणीं मराठ्यांचा बापु गोखले याच्या नेतृत्वाखालीं पूर्ण जय झाला. असें असतांना ईस्ट इंडिया कंपनीनें त्या जागेवर मराठ्यांचा पराभव झाला म्हणून कायमचा जयस्तंभ उभारला आहे. सदर प्रसंगीं मराठ्यांच्या या मर्दुमकीनें दिपून जाऊन राहिलेले सेनानी परत गेलेले आहेत असा आज नव्यानेंच इतिहास उपलब्ध झालेला आहे व क्रमिक पुस्तकांतून तो आम्हांस निराळ्या तऱ्हेनें शिकविला जात आहे. करतां सदरचा पोवाडा लिहून त्यावर सत्यप्रकाश अल्पशा प्रयत्नानें पाडीत आहें.

या प्रसंगीं सदर सेनानी यांस बापु गोखले यांनीं मराठ्यांस साजेल अशाच उदार अंतःकरणानें वागविलें आहे व याच उदार बुद्धीमुळें कित्येक वेळां, भारतीय आपल्या राज्यास मुकलेले आहेत; याचीं ठळक उदाहरणें इतिहासज्ञांना ज्ञात आहेतच. म्हणून त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. सर्व भारतीयांची अद्यापपर्यंत एकच भावना जागृत आहे, ती ही कीं, निःशस्त्र लोकांवर शस्त्र चालविणें हा धर्म नव्हे. अशा लोकांवर शस्त्र चालविणें हें फक्त पंढाचेंच काम आहे. खऱ्या क्षत्रियाचें कर्म इतकेंच कीं, सामनेवाला प्रतिस्पर्धी सशस्त्र असेल तर त्याच्याशीं दोन हात करून स्वपराक्रमानें त्यास नामोहरम करणें.

इत्यम्

220

जय हिंद माता ॥

## शाहीरी डफ . . . . . पोवाडा ९ वा

## जवानमर्द ब्राह्मणभाई बापू गोखले

यांचा

# पोवाडा

( ले. प्रल्हादराय )

धन्य धन्य बापु गोखले, पराक्रमी वीर । वाघ बघतांच हरणाचे कळप पळती दुरदुर । खवळला दरिंचा सिंह दुःसमनावर । टोपिवाला मनामधें चूर । चूर त्याचें उर । म्हणे रणशूर । हाच ! नडणार ॥ धृ० ॥

### चौक १ ला

पुण्यपुरीच्या तक्तावरतीं होते पेशवे धनी । शत्रू धांवती चौहु बाजूनीं ॥
बाजिराव हें नांव तयाला जन वदती वदनीं । मराठा समशेरीचा धनी ॥
महाराष्ट्राच्या स्वराज्यवृक्षा कीड लागली फार । भरला फितुऱ्यांचा बाजार ॥
आपसामध्यें द्वेष माजला ज्याचा तोच मुखत्यार । तुटला दौलतिचा आधार ॥
रक्षक तेची तक्षक बनती मिळती शत्रूला । विसरले अपुल्या कीर्तीला ॥
जवानमर्द सरदार मानकरी भुलुनी मोहाला । बळी ते पडले स्वार्थाला ।
भारतभूमि[illegible]। शौर्यरवीला ग्रहण लागलें हाय ! । सुचेना कोणा कांहीं उपाय ॥
(चाल) मिथ्या चहूंकडे पसरलें जाळें । पारधी आवळी गळफांस ॥
त्यांतही पहा हे आले । नादान राज्य गादीस ॥
देउनि हक्क दुसऱ्यातें । तलवार ठेवली खुंटीस ॥

(मिळवणी)

परंतु सारे वीर संपले एक धीर गादीला । मराठा गडी बापु गोखला ।

## चौक २ रा

इरेसि चढले बापु गोखले रक्त तयांचें सळसळलें ।
रक्त उसळतां बंद छातिचे तटातटही ते तुटले ॥

चाल:–

बापु आला तत् निकराला । हातामधीं पट्टा चढविला । सूडाची धुंद डोळयांला । असूदानें हात माखलेला । लवलवा चम्के बिज्ली गगनाला । तिच चमक त्याचे तलवारभाल्याला । हरहर महादेव गर्जला । गर्जना करोनि तोडला कित्येक मुंडक्याला ॥ धुम धड्ड्ड् आवाज तोफांचा । कडकडा आवाज जेजाल्यांचा । सूसणणण वर्षाव गोळयांचा । धा ऽ ऽ ड धाड आवाज दोन्ही बाजूंचा । गोळे उडतांच नाश सैन्यांचा । सडा छिन्नभिन्न देहांचा । रणदेवता प्रसन्न जाहली जय वायूचा ॥

(चाल) खडकीच्या मैदानावर । कंपनी सरकार । होती तय्यार ।
स्वराज्यास देण्याला गळफांस ? । शेवटला हिरा चमकला ।
छातीवर बसला । बाजीराव नडला । त्याच्या युद्धास ॥
(चाल) आंग्रज नका मोडूं तुम्ही आज । त्यांची दोस्ती हवी ती मज ।
युद्ध थांबवा आजचे आज । पुढच्या पुढें पाहूं हें काज ॥
निरोप गेला खाशांचा खास । परतूनि यावें गोटास ॥
(चाल) निरोप मिळतांच बापुनं बंद केलं युद्धाला ॥
रावबाजीस घेतलंय त्यानं आपल्या संगतीला ॥
धरला रस्ता गोखल्यान सिंहगडीं जाण्याला ॥
मागोमाग टरनर माग काढीत चालला ॥
तों शिकारी मागे पारधी पहा लागला ॥
सिंहगडावरी तैं हल्ला त्यानें चढविला ॥
दमछाट पुरी जाहली गड घेण्याला ॥
हातामध्यें सिंहगड मोकळा तवा लागला ॥
तडतडा मनगट तोडलें त्यानं वखुताला ॥
दारु, गोळा, तोफा लागल्या त्याचे हाताला ॥
तोफा फोडूनि लाविती आग दारु गोळयाला ॥
इतक्यांत रावानें पल्ला दूर मारिला ॥

झटक्यांत सातान्यास वळसा घालुन माहुलिला ॥
तेथेंच निपाणकर येउन मिळाले बापुला ॥
एक हजार निधडे राऊत त्यांच्या संगतीला ॥

( मिळवणी )

सालप्याच्या घाटमाथ्यास । ठेवूनसैन्यास । म्हणे सरदारांस । येथें अडवावा टोपिवाला । दबा धरून बसले समयाला । देती चोपाला । गर्व खालीं केला । धन्य बापुला ॥

चौक ३ रा

धन्य धन्य बापु गोखले । पराक्रमी महान । संगतीला घेतले सरदार विंचूरकर सैन्य होतं गन्तीला पांच हजार रणशूर । हल्ल्यावर हल्ला चढविला । नाहीं तो भ्याला । वेगें चालला । खड्ग बहाद्दर ॥

चाल:—

बापुची दौड चहूंकडे । पळतांना कोठें ना आडे । हुल दावूनि जाई दुसरीकडे । मोर्चा दावला पंढरपुराकडे । स्मिथ धांवला त्याच दिशेकडे । लागली खबर गेला नगराकडे । पळतांना स्मिथाच्या तोंडिं फेस बुडबुडे ।

चाल:—

राव तेथून आले नाशकास । मिळाले त्यास । त्रिंबकपंत खास ॥ घेऊन श्यान समद्या सैन्यास । आले चाकणास । सामना देण्यास । झटक्यांत चाकण करुन सर । करुन देऊं डर । पुण्याच्या सामोर ॥

चाल:—

टोपिवाले झाले घामाघुम । ठोकुनी धुम । गांठला मुक्काम । राव, गोखले लागे ना हातास । अन्नपाणी मिळेना त्यास । त्याचे सैन्याला । स्मिथ रडविला । रखनदळ खास ॥

चाल:—

स्मिथ झाला विस्मित तेथें चित्तांतची तो गडबडला ।
काय करावें सुचे न मजला शोधूं कुठें मी बापुला ॥
चाल:—बेटा स्मिथ केला जर्जर । झाला तो फार । गांठल शिरूर ॥
तोफा फेकुन दिल्या दुरदुर । जाई ना म्होर । छाती कमजोर ॥

(मिळवणी)

रावबाजी वीर गोखला। भुलवी शत्रुला। नाहीं तो भ्याला। इंग्रजी शिस्त ढळढळां रडली। शिस्तीचा मान हरपला। नाहिं राहिला। रावोमाळ फिरला। भंवेरी उडली ॥

चौक ४ था

मगरमिठी बसली बापुची। खड्या सैन्याची। ढालभाल्याची। धक्काच बसला टोपिवाल्यास। धडधडा त्यांचा उर उडे। पडे सांकडें। बुद्धी ती अडे। बापु धरण्यास ॥राजनिष्ठास आनंद जाहला। भानु उदयाला। वेळ किती बोला। अंग्रजांस धरलं त्यान चरकांत। स्वातंत्र्य आतां टिकणार। फितुरे मरणार। केलं त्यान थेर राज्य घातास॥ बदमाशांनीं जमविला तांडा। ऐशा या धंदा। नेऊनियां कोंडा। अथवा द्यावें त्यांना फांसास। बुडविल कित्येक राज्यास। हिंद देशास। आणि स्वतःस। अधोगति खास॥ बापुची पाहुनी पकड। फितुर झाल येड। करितां बडबड। गादी पेशव्यांची खास टिकणार। हत्तीच्या देऊनि पायाला। बांधुनि तोफेला। घेतिल प्राणाला। सर्वस्वींनाश॥

चालः— असा कंप सुटला पहा घरभेद्यांस ॥
टोपिवाल्यास मिळाले भेदे कितिक वेळेस ॥
दास्याची बेडी घालिती भरतभूमिस ॥
घरामधलीं भुतें हात धुवून लागलीं पाठिस ॥

चालः—

फितुऱ्यांचा सुळसुळाट झाला। स्वार्थार्थ बुडवि देशाला। असेकसे पापी चांडाळ येती जन्माला ॥ बुडविल कितिक राज्यांला। चढविलं कितिक फांसाला। कित्येक ठेवलं किल्ल्याला। असा वणवा लागला देशाला ॥ बुडव्यांचा धुमाकुळ नेहमीं असा चालला ॥

चालः——झांशीच्या दुर्गावर गेली दुर्ग कोसळला ॥
दिल्लीच्या गादीवर गेली घेतलं गादीला ॥
शनवारच्या वाड्यावर गेली काढलं झेण्ड्याला ॥
सातारच्या गादीवर गेली कोंडलं राजाला ॥
फितुऱ्यांचा खेळ हा सदा-निदा चालला ॥

भेद्यांच्या नाशाविना विजय कसा कोणाला ? ॥
सदबुद्धी देवा देऊनि राखी देशाला ॥
विनवितो प्रल्हादराय शाहीर प्रभु चरणाला ॥
देशबुडवे फितुरे हे घालुं नको जन्माला ॥

(मिळवणी) त्यासी स्मिथ सलाम करुन। बोले बेगुमान। असला दुःस्मान। खंदा वीर राहयला एक राज्यांत। तोंवरी आशा संपली। आमुच्या भालीं। पळापळी आली। रानावनांत।

## चौक ५ वा

स्मिथ आला बार भरुन। पुण्याच्या रोखानं। संगिन परजुन। कोरेगांव घोतलं त्यानं ताब्यांत। तटबंदी संध्या गांवाला। आणि फौजेला। करून समयाला ठेवल दाबांत ॥

भिमथडीच्या एका तिरांवर। मराठा वीर। उभा सामोर। पहातांच रोखली त्यान पाणवाट। गर्वानें स्मिथ बोलला। रस्ता अडविला। खुला करण्याला। रक्ताचे पाट ॥ संगिन, भाला, आणि तलवार। तोफांची फैर। झडली अनिवार। चरचरां कापती एकमेकांस। असूदाचा पाट वाहिला। रस्ता खुला झाला। स्मिथ पळाला। दडला गांवांत ॥

चालः——

माध्यान्हीचा भानु तळपला। बापु गोखला। कोरेगांवाला।,दावि तेजाला ॥ येढा दिला संध्या गांवाला। आणि सैन्याला। भीति संध्यांला। काळ हा आला॥ अन्न मिळेना मुळीं खाण्याला। पाणी पिण्याला। हताश तो झाला। आफळी टोपिला ॥

चालः——

चिलमुसाचे तुकडे उडविले त्यान त्या वख्ताला ॥ वुईन गेट गेटावरी घट्ट त्यानें बांधिला॥ ।बांधूनश्यान तोडलय त्येन त्येचा मुंडक्याला॥ धर्मशाळा तवाच सर करुन घेतली हाताला तोफांचा पाडाव करूशान घेतल्या ताब्याला ॥

असा कहर उसळला आंग्रज धरला नेटाला ॥
दाणादाण झाली अंग्रजांची लपला खोऱ्याला ॥
डेंगळ्यानें तेथेंही त्याला खूप चेचिला ॥
अभयदान देऊन त्यानं राखल शत्रूला ॥
धर्मयुद्ध केल मराठ्यांनीं धन्य बापुला ॥

चाल:—निःशस्त्रावर शस्त्र मारितां पुरुषार्थचि तो काय झाला ।।
अशा लोकावर शस्त्र चालवून षंढ मिळवी विजयाला ।।
धर्मयुद्धाचा नियम असा हा ठाऊक आहे हिंदूला ।।
म्हणूनच मुकले कित्येक वेळां हिंदु आपल्या राज्याला ।।
चाल:—कोरेगांवीं अपजय झाला अंग्रजी सैन्याचा ।
तरीही म्हणे जय आमुचा
अपजयाची बांधुन गाठुडी फेक्ती गळचांत ।
पुनः मोकळी व्हती तेथ ।।
विजयस्तंभ तो तेथें रोविला रणमैदानावर ।
जगाला खरं कसं कळणार ।
खरी गोष्ट ती छपतच नाहीं येईल उघड्यावर ।
सत्य तें जगास कळणार ।।
वीर मराठे भित्रे सगळे कसले हे शूर ।
भासती आम्हा वेडे पीर ।
भित्रे कसले मर्द मराठे सत्य सत्य वाचा ।
मराठा बच्चा सिंहाचा ।।
चाल:—दावुनि जयाचा भास । मिरविला तोरा ऐटीनं ।।
कोरेगांवीं लेप्टनंट कर्नल । बिनशर्त सोडिती रण ।।
खोटयाच खर लिहून । इतिहास आम्हां शिकवून ।।
ठेविती पूर्ण अज्ञान । तरी म्हणती केलं सज्ञान ।।

(मिळवणी)

तेजस्वी तारा चमकला। जोरावर आला। कोरेगांवाला। सेनानी लपती घराघरांतूनि। शिवराम महादेवांनीं । लेख लिहूनि । आणिले मैदानि । प्रल्हादराय आज सांगतो सर्वांस।।

संपूर्ण

---

( प्रस्तुत पोवाडा देशभक्त प्रो. शि० म० परांजपे यांच्या मराठ्यांच्या लढाया या पुस्तकाचे व जुन्या पोवाड्याचे आधारें लिहिला आहे. )